वाचले,

१) दि.१४/८/२०१३ ची विभागप्रमुख आढावा बैठक.

२) मा.आयुक्त यांनी मान्य केलेला दि. /०८/२०१३ चा प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
जा.क्र.नासुके/१/कावि/ ५७४ /२०१३
दि. १४ /०८/२०१३

**विषय :- मनपा मार्फत नागरिकांना देण्यात येणा-या दाखले / परवाने यांचे मागणी अर्ज मोफत देणेबाबत. . .**

**आदेश**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांना विविध प्रकारचे दाखले/ परवाने देण्यात येतात. सदर दाखले / परवाने मिळण्यासाठी महापालिकेने अर्जाचे विहित नमुने / फॉर्म आणि किंमत ठरविलेली आहे.

नागरीकांच्या सोईसाठी हे सर्व नमुने उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच ही सर्व माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून संगणकावरुन नमुने डाऊनलोडही करुन घेता येतात. ही बाब विचारात घेता ज्या फॉर्मची फी अधिनियमांमध्येच नमूद केलेली आहे त्या बाबी वगळता महानगरपालिकेचे सर्व फॉर्मस दि.१४/८/२०१३ पासून संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८. या आदेशान्वये नागरीकांच्या सोईसाठी आवश्यक असणारे दाखले / परवाने मागणीचे नमुना अर्ज ज्याची फी अधिनियमांत नमूद केली आहे असे फॉर्म वगळून उर्वरीत सर्व फॉर्म दि.१६/८/२०१३ पासून मोफत उपलब्ध करुन देण्यास मान्यता देत आहे.

(डॉ.श्रीकर परदेशी)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत,

ई-गर्व्हनन्स विभाग.

२/- मनपाचे वेबपोर्टलवर प्रसिध्दीसाठी.